# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

## कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी प्रवेश कार्यक्रम २०१६-१७

(सविस्तर माहितीसाठी **www.mcaer.org** किंवा **maha-agriadmission.in** पहा)

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता खाली नमूद केलेल्या आचार्य पदवी अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांकडून प्रवेश माहिती पुस्तिका २०१६-१७ मधील सूचनेनुसार ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे. अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी राहील.

**१. उपलब्ध विद्याशाखा**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अ.क्र. | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| (१) | पीएच.डी. (कृषी) | (२) | पीएच.डी. (गृहविज्ञान) |
| (३) | पीएच.डी. (मत्स्यशास्त्र) | (४) | पीएच.डी. (कृषी जैव तंत्रज्ञान) |
| (५) | पीएच.डी. (कृषी अभियांत्रिकी) | (६) | पीएच.डी. (अन्न तंत्रज्ञान) |

२. प्रवेश पात्रता, महाविद्यालय, प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज **दि.२९ सप्टेंबर,२०१६** पासून **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

३. एकूण प्रवेश क्षमतेच्या २ टक्के जागा राज्याबाहेरील उमेदवारांसाठी राखीव आहेत.

४. उमेदवारांनी **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे संगणकावर प्रवेश अर्ज भरावा आणि प्रवेश अर्जाची download केलेली प्रत, आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती 'कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८, महाराष्ट्र' येथे पाठवावीत.

५. टपाल / कुरीयर सेवेच्या विलंबामुळे प्रवेश अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास कृषी परिषद, 'केटीपीएल' अथवा संबंधित कृषी विद्यापीठ जबाबदार राहणार नाहीत. अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज रद्दबातल ठरविण्यात येतील.

**आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक ०५/१०/२०१६ असून 'केटीपीएल' यांच्या पत्त्यावर अर्जाची मुद्रित प्रत पाठविण्याचा अंतिम दिनांक ०७/१०/२०१६ आहे.**

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी प्रवेश अर्जासोबत भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. २०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. १०००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

**शुल्क प्रदानाची पध्दती-**

भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये चलनाद्वारे, क्रेडीट कार्ड / डेबीट कार्ड, नेट बँकींगद्वारे शुल्क भरण्यात यावे किंवा धनाकर्षाद्वारे शुल्क भरण्यात यावे. धनाकर्ष 'वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे' (Financial Advisor, MCAER, Pune) यांच्या नावे पुणे येथे देय असावा. सदर धनाकर्ष प्रवेश अर्जासोबत जोडावे. चलनाद्वारे शुल्क भरल्यास चलनाची प्रत प्रवेश अर्जासोबत जोडावी.

क्र. मकृप/शिक्षण-१/४९१६/ २४१८/२०१६

दिनांक- २०सप्टेंबर,२०१६

महासंचालक

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे